# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 04 November 2024

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस
- मराठवाड्यात जालना, भोकरदन, बीड, केज, फुलंब्री, कन्नड आणि हिंगोली मतदारसंघांत उमेदवार देण्याचे मनोज जरांगे पाटील यांचे संकेत
- शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांच्या निवडणूक शपथपत्रातल्या त्रुटीबाबत चौकशीचे निवडणूक आयोगाचे निर्देश
- दीपोत्सवात भाऊबीजेचा सण काल घरोघरी पारंपरिक पद्धतीने साजरा

आणि

- मुंबई क्रिकेट कसोटी जिंकत न्यूझीलंडचा भारताविरोधात निर्भेळ मालिका विजय

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. राज्यातल्या २८८ मतदारसंघांमध्ये सात हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मात्र यापैकी किती उमेदवार माघार घेतात आणि किती उमेदवारी निवडणूक रिंगणात कायम राहतात, हे आज सायंकाळनंतरच स्पष्ट होईल.

राज्यात मराठवाड्यातल्या ४६ मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत, यामध्ये नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्या खालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीड विधानसभा मतदार संघात ९० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त पाच उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहिम आणि सिंधुदुर्ग

जिल्ह्यातल्या सावंतवाडी मतदारसंघात प्रत्येकी सहा, तर शिवडी आणि कुडाळमध्ये प्रत्येकी सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

****

राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी आपापल्या पक्षातल्या बंडखोरांना शांत करण्याच्या प्रयत्नात असल्याचं दिसून येत आहे. आज अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यातल्या प्रमुख पक्षांच्या जागावाटपाचं चित्र स्पष्ट होणार आहे.

****

महायुतीच्या मोर्शी, आष्टी, श्रीरामपूर, दिंडोरी, देवळाली, अणुशक्तीनगर, मानखुर्द यासह ३६ ठिकाणी तर महाविकास आघाडीत परंडा, पंढरपूर, दिग्रस, धारावी, मानखुर्द, सोलापूर शहर मध्य, सांगोला आणि लोहा यासह २६ ठिकाणी इच्छुकांनी बंडखोरी केली आहे. महायुतीकडून तसंच महाविकास आघाडीकडून आपापल्या पक्षातल्या बंडखोरांना शांत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय जनता पक्षाचे ९९ टक्के बंडखोर, उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत, त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

****

महायुतीच्या प्रचाराला कालपासून प्रारंभ झाला. शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, मुंबईत कुर्ला इथं शिवसेना – महायुतीचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्या निवडणूक प्रचारार्थ काल पहिली प्रचार सभा घेतली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या प्रचारसभांनाही आजपासून प्रारंभ होत आहे. पहिली जाहीर सभा डोंबिवलीत तर दुसरी ठाण्यात होणार आहे.

****

रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जागावाटपामधली नाराजी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा, असं आवाहन, रिपब्लिकन पक्षाचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी केलं आहे. रिपब्लिकन पक्ष महायुतीचा घटक पक्ष असल्यानं महायुतीला विजयी करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असंही सोनवणे यांनी म्हटलं आहे.

****

धनगर समाजाच्या न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या यशवंत सेना या संघटनेनं, विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला पाठींबा जाहीर केला आहे. संघटनेचे अध्यक्ष आणि सरसेनापती माधव गडदे यांनी काल पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर ही भूमिका जाहीर केली.

****

मराठवाड्यातल्या जालना, भोकरदन, बीड, केज, फुलंब्री, कन्नड आणि हिंगोली या विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार देण्याचे संकेत, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी दिले आहेत. विधानसभा निवडणुकांबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी काल जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं सहकाऱ्यांसोबत घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. आपण ज्या जागा जिंकू शकतो अशा ठिकाणी उमेदवार देऊ आणि इतर ठिकाणी ज्यांनी आपल्याला त्रास दिला त्यांचा आपण पराभव करू, अशी भूमिका, जरांगे यांनी या बैठकीत मांडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

शिवसेनेचे नेते, मंत्री अब्दुल सत्तार यांच्या चौकशीचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. सत्तार यांच्या निवडणूक शपथपत्रातल्या मालमत्तेसंबंधी माहितीमध्ये १६ त्रुटी असल्याचे आरोप, सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली आणि डॉ. अभिषेक हरिदास यांनी निवडणूक आयोगाकडे एका तक्रारीद्वारे केले होते. निवडणूक आयोगानं या तक्रारीची दखल घेत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना या प्रकरणाची तातडीनं चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

****

परभणी जिल्ह्यातल्या रामपुरी इथं दिवाळी पहाट ही सुरेल संगीत मैफल काल घेण्यात आली. यावेळी स्वीप नोडल अधिकारी गणेश शिंदे त्यांच्या मार्गदर्शनात मुख्य समन्वयक अरविंद शहाणे आणि प्रफुल्ल शहाणे यांच्या संचाने, नागरिकांना येत्या २० तारखेला मतदान करण्याचं आवाहन केलं..

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज नागपूर जिल्ह्यातल्या आठ विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस हमीभावाने खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचं राज्य असून, ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचं उत्पादन घेतात. राज्यात भरपूर कापूस उत्पादन होत असताना, २२ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत ही बाब शासनानं लक्षात घ्यावी असं पटोले यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

सणांचा समूह असलेल्या दीपोत्सवात काल भाऊबीजेचा सण पार पडला. घरोघरी बहिणींनी भावांना औक्षण करून, त्यांच्या दीर्घायुष्याची मंगल कामना केली, तर भावांनी बहिणींना ओवाळणीच्या रुपात आकर्षक भेटवस्तू दिली. काल भाऊबीजेच्या पार्श्वभूमीवर वस्त्रप्रावरणं, आभुषणं आणि इलेक्ट्रीक तसंच इलेक्ट्रॉनिक साहित्याच्या दुकानांमधून मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल गवळी समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सगर महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये रेड्यांना सजवून त्यांची मिरवणूक काढली जाते. पशुपालकही पारंपारिक पोषाख घालून मोठ्या उत्साहाने यामिरवणुकीत सहभागी झाले होते.

****

बीड इथं जिल्हा क्रीडा संकुलातल्या खो-खो च्या मैदानावर दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा करण्यात आला. जिल्हा क्रीडा कार्यालय, बीड जिल्हा खो-खो असोसिएशन, आणि साई-गणेश क्रीडा मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात नागरिकांनी दिवे प्रज्वलित करून परस्परांना शुभेच्छा दिल्या.

****

न्यूझीलंडने भारताविरुद्धच्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत निर्भेळ यश मिळवलं आहे. काल मुंबईत झालेला तिसऱ्या आणि अखेरच्या सामनाही न्यूझीलंडनं अवघ्या २५ धावांनी जिंकला. न्यूझीलंडचा दुसरा डाव काल सकाळच्या

सत्रात १७४ धावांवर आटोपला, पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळे भारताला विजयासाठी १४७ धावा करायच्या होत्या, मात्र भारताचा दुसरा डाव अवघ्या १२१ धावांवर संपुष्टात आला. यष्टिरक्षक ऋषभ पंतने एकाकी झुंज देत ६४ धावा केल्या, वॉशिंग्टन सुंदरने १२ तर कर्णधार रोहित शर्माने ११ धावा केल्या, रवीचंद्रन अश्विन आठ, रवींद्र जडेजा सहा, यशस्वी जैस्वाल पाच, शुभमन गिल, विराट कोहली आणि सर्फराज खान यांनी प्रत्येकी एक धाव केली तर आकाशदीप आणि मोहम्मद सिराज शून्यावर बाद झाले. सामन्यात ११ बळी घेणारा न्यूझीलंडचा एजाज पटेल सामनावीर, तर विल यंग मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

****

१४ व्या हॉकी इंडिया अजिंक्यपद स्पर्धांना आजपासून चेन्नईत प्रारंभ होत आहे. १६ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत ३१ संघ सहभागी होत आहेत. उपांत्य फेरीचा सामना १५ नोव्हेंबरला तर अंतिम सामना १६ नोव्हेंबरला खेळवला जाणार आहे.

****

नंदुरबार जिल्ह्यात भरधाव जीपनं दिलेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला. शनिवारी रात्री उशीरा नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर लोय पिंपळोद गावाजवळ हा अपघात झाला. रस्त्याच्या कडेला नादुरुस्त दुचाकीजवळ उभ्या असलेल्यांना भरधाव गाडीनं धडक दिली. यात १२ ते ४० वर्षं वयोगटातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याला नंदुरबार इथं जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती, आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यातल्या आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांच्या पार्थिव देहावर काल आरमोरी तालुक्यातल्या जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. वरखडे यांचं शनिवारी रात्री नागपुरात एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते.

****

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

****